# सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांसाठी फिजिओथेरपी उपचार सुविधा

## फिनोलेक्स व मुकुल माधव फाउंडेशनचा उपक्रम

**पुणे :** फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशनतर्फे साताऱ्यातील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना फिजिओथेरपी उपचार उपलब्ध करण्यात येत आहेत. सातारा येथे संचेती हॉस्पिटलमधील तज्ज्ञ फिजिओथेरपिस्टना बोलावून ही सेवा दिली जात आहे. या मुलांच्या नियमित शुश्रुषेसाठी प्रत्येक बुधवारी हे डॉक्टर येथे जाणार आहेत.



याबाबत मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया म्हणाल्या, उद्घाटनाच्या दिवशी १९ मुलांनी आमच्या सेवांचा लाभ घेतला. हळूहळू व यथावकाश याबाबत माहिती देऊन साताऱ्यात आमची गरज असलेल्या प्रत्येक मुलापर्यंत पोचण्याची आम्हाला आशा आहे. वाईमधील आमचे पहिले केंद्र मिरजकर हॉस्पिटलमध्ये यशस्वीरित्या चालू आहे आणि लवकरच पाटण तालुक्यात तिसरे केंद्र उघडण्याची आमची योजना आहे. शिवाय, वाई केंद्रात आम्ही स्पीच थेरपी पुरवत असून साताऱ्यातही ही सेवा पुरविण्यात येईल. पुढील शिबिर शुक्रवारी ३० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून जिल्हा परिषद शाळा रमापूर क्र. २, पाटण येथे होणार आहे. या प्रकल्पात कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस आणि कराड येथील फिजिओथेरपीचे फॅकल्टी सहभागी होणार आहेत. संचेती हॉस्पिटलचे ऑर्थोपेडिक डॉक्टर आणि कृष्णा हॉस्पिटल येथील फिजिओथेरपिस्टची टीमही असणार आहे.